वाचले :

१. ज्ञापन क्र: स्था/२०/कावि/१४/२०२३ दिनांक २९/०८/२०२३.
२. सह शहर अभियंता, स्थापत्य विभाग यांचेकडील पत्र क्र.स्थापत्य/२०/कावि/१४/२०२३ दि-३०/१०/२०२३
३. मा. आयुक्त सो. यांचेकडील दिनांक २०/०२/२०२४ रोजीचा मंजुर प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८, सामान्य प्रशासन विभाग,
क्र साप्रवि/९/कावि/ २३४ /२०२४
दिनांक:- ०४/०३/२०२४

विषय : **दंडात्मक शास्ती कारवाई करणेबाबत..**
**श्री. निगडे महेश नंदकुमार, उपलेखापाल**

आदेश,

**ज्याअर्थी,** श्री. निगडे महेश नंदकुमार, उपलेखापाल,यांचेकडे स्थापत्य प्रकल्प विभागाचा अतिरिक्त कार्यभार सोपविणेत आलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य प्रकल्प विभागामार्फत निविदा नोटीस क्र.०४/०१/२०२३-२०२४ अन्वये मौजे मोशी येथील मनपाच्या ताब्यात असलेल्या गायरन जागेवरील हॉस्पीटल बांधणेच्या जागेस सिमाभित बांधणे व तदअनुषंगिक कामे करणेकरिता मे.सिध्दनाथ कार्पोरेशन यांची लघुत्तम निविदा प्राप्त झाल्याने त्यांना कामकाज देणेत आलेले आहे.

**आणि ज्याअर्थी,**, सदर निविदेस मा.स्थायी समिती सभेच्या अधिकारातंर्गत मा.प्रशासक यांचे मान्यतेसाठी विषयपत्र दि-०९/०८/२०२३ रोजी मा.नगरसचिव यांचेकडे पाठविले असता त्यामध्ये **मे.सिध्दनाथ कार्पोरेशन** ऐवजी **मे.सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** झाल्याचे दिसुन आल्याने प्रकरणी कामकाजात हलगर्जीपणा केल्याने श्री. निगडे महेश नंदकुमार, उपलेखापाल, यांना वाचले क्र. १ अन्वये ज्ञापन देणेत आलेले आहे. वाचले क्र.२ च्या पत्रान्वये विभागप्रमुख सह शहर अभियंता, स्थापत्य विभाग यांनी निविदा क्र. ०४/०१/२०२३-२०२४ तयार करण्यात आलेल्या प्रस्ताव,विषयपत्र व ठरावामध्ये चुकीने **मे.सिध्दनाथ कार्पोरेशन** ऐवजी **मे.सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** अशी चुक झालेली आहे.अन्य तपशीलामध्ये कोणताही बदल नाही.त्यासाठी दुरुस्ती विषयपत्र विभागामार्फत सादर करणेत आला असता मा.आयुक्त सो.यांनी दुरुस्त विषयपत्रास मान्यता दिल्याचे कळविलेले आहे. तथापी, श्री. निगडे महेश नंदकुमार,उपलेखापाल यांनी कामकाजात निष्काळजीपणा व कर्तव्यात कसूर करून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३(१)(एक)(दोन)(तीन) चे तरतुदीचा भंग केलेला आहे.

**त्याअर्थी,** मी,अतिरिक्त आयुक्त-२,पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मा. आयुक्त सो. यांचेकडील वाचले क्र. ३ च्या मान्य प्रस्तावान्वये, उदधृत प्रकरणी श्री. निगडे महेश नंदकुमार, उपलेखापाल यांना विभागप्रमुखांमार्फत वाचले क्र. १ अन्वये देण्यात आलेले ज्ञापन विचारात घेता, एक वेळची संधी म्हणुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६(२) ड चे अर्थांतर्गत तरतुदीनुसार **त्यांचेविरुध्द कामकाजातील हलगर्जीपणास्तव र.रु ५००/-दंडात्मक शास्ती कारवाई करणेत येत आहे.** सदरची रक्कम त्यांच्या नजीकच्या मासिक वेतनातुन वसुल करावी. **तसेच श्री.निगडे महेश नंदकुमार, उपलेखापाल यांचेकडे स्थापत्य प्रकल्प विभागाचा सोपविणेत आलेला अतिरिक्त पदभार प्रस्तुत आदेशान्वये निरस्त करणेत येत आहे.**त्यांनी पुर्णवेळ वैद्यकिय विभागात धन्वतरी कक्षाचे कामकाज पहावे. श्री. निगडे यांचेकडे अतिरिक्त पदभार सोपविणे विषयी कोणतेही नव्याने प्रस्ताव मा.आयुक्त सो. यांचेकडे सादर करू नये. तसेच श्री.

निगडे यांनी, यापुढे भविष्यामध्ये कामकाजामध्ये हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यास अथवा कर्तव्य पालनामध्ये कसुर केल्यास त्यांचेविरुध्द कठोर शास्तीची कारवाई करण्यात येईल याची त्यांनी स्पष्टपणे नोंद घ्यावी.प्रस्तुत आदेशाची नोंद त्यांच्या सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

( **विजयकुमार खोराटे** )
अतिरिक्त आयुक्त - २,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८

प्रति,

१) **श्री. निगडे महेश नंदकुमार, उपलेखापाल,**
**वैद्यकिय विभाग धन्वंतरी कक्ष**

प्रत,

१) **वैद्यकिय विभाग.**

२/-प्रस्तुत आदेश **श्री. निगडे महेश नंदकुमार, उपलेखापाल,** यांना बजाविणेत येवुन त्यांची दिनांकित स्वाक्षांकित पोहोच तात्काळ सादर करावी.व दंडात्मक शास्ती रक्कमेची वसुली श्री.निगडे यांचे मासिक वेतनातुन करुन तसा अनुपालन अहवाल इकडील विभागास सादर करावा.

२) सामान्य प्रशासन टेबल क्र.४,१२,१४,२२ सामान्य प्रशासन संगणक कक्ष.

३) **स्थापत्य विभाग.**

४) लेखा विभाग.